दैनिक

मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ३५५ वा ● मंगळवार, ता. १५ जुलै २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००

## बनावट खतांविरोधात केंद्र सरकारचे कडक पाऊल

### देशभरात बनावट आणि निकृष्ट दर्जाच्या खतांची विक्री वाढली

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

देशभरात बनावट आणि निकृष्ट दर्जाच्या खतांची विक्री वाढल्याच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी केंद्र सरकारने मोठे पाऊल उचलले आहे. केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण तसेच ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून अशा प्रकारांवर कठोर कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. चौहान यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे की, शेतकरी हा आपल्या देशाचा कणा असून त्यांच्या शाश्वत प्रगतीसाठी आणि उत्पादन क्षमतेसाठी गुणवत्तापूर्ण खते वेळेवर आणि योग्य दरात उपलब्ध होणे आवश्यक आहे. मात्र, काही ठिकाणी बनावट, भेसळयुक्त आणि मानकांखालील खतांची विक्री होत असल्याच्या तक्रारी वारंवार प्राप्त होत आहेत. यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान तर होतेच, शिवाय शेतीचे उत्पादनही घटते. राज्य सरकारांना दिलेले निर्देश : बनावट खतांचे उत्पादन, साठवणूक व विक्री करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करा. खत विक्री केंद्रांवर नियमित तपासणी व नमुना परीक्षणाची मोहिम राबवा. दोषी वितरक, व्यापारी, आणि कंपन्यांवर गुन्हे दाखल करून त्यांचे परवाने रद्द करा.



शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करून त्यांना शुद्ध खत ओळखण्यासंबंधी प्रशिक्षण द्या. केंद्र सरकारच्या 'एफसीओ' (Fertilizer Control Order) अंतर्गत निर्धारित निकषांची काटेकोर अंमलबजावणी सुनिश्चित करा. चौहान यांनी खतांच्या वाहतुकीवर आणि विक्रीवर देखरेखीसाठी डिजिटल प्रणालींचा अधिक प्रभावीपणे वापर करण्याची सूचना केली. त्यात खासगी कंपन्यांची जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्याचेही सांगण्यात आले आहे. शेतकऱ्यांचे हित हेच आमचे सर्वोच्च उद्दिष्ट आहे. बनावट खतांमुळे त्यांचा होत असलेला सर्व प्रकारचा नुकसान टाळणे हे केंद्र आणि राज्य सरकारांची सामूहिक जबाबदारी आहे, असे चौहान यांनी पत्रात म्हटले आहे. या पत्रानंतर विविध राज्यांतील कृषी विभागांकडून तत्काळ हालचाली सुरू झाल्या असून, काही राज्यांनी तपासणी मोहीम व हेल्पलाईन सुरू करण्याचे संकेत दिले आहेत. या उपक्रमांमुळे देशातील खत वितरण प्रणाली अधिक पारदर्शक आणि विश्वासार्ह होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. तसेच, शेतकऱ्यांना योग्य वेळी दर्जेदार खते मिळाल्यास शेती उत्पादनात वाढ होण्यास मदत होईल.

## एसटीचे खासगीकरण होणार नाही

### परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे स्पष्ट प्रतिपादन

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्य शासनाचा अंगीकृत सार्वजनिक उपक्रम असलेली महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी) ही सुमारे ८३ हजार कर्मचाऱ्यांची 'मातृसंस्था' आहे. या महत्त्वाच्या उपक्रमाचे भविष्यात खासगीकरण होईल, अशा प्रकारच्या अफवा सध्या पसरवल्या जात आहेत. मात्र, या सर्व अफवांना पूर्णविराम देत, ''एसटीचे कदापि खासगीकरण होणार नाही,'' असे ठाम प्रतिपादन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले आहे.. परळ येथील एसटी बसस्थानकात आयोजित एका कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमात प्रवासी व कर्मचाऱ्यांच्या सोयीसाठी जलशीतक (पाण्याचा फिल्टर व कुलर) बसविण्यात आले. या जलशीतक योजनेचे लोकार्पण मंत्री सरनाईक यांच्या हस्ते करण्यात आले. राष्ट्रीय एसटी कामगार काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बर्गे यांच्या पुढाकाराने व कामगार नेते भाई जगताप यांच्या संकल्पनेतून या उपयुक्त सुविधेची उभारणी करण्यात आली. या वेळी बोलताना प्रताप सरनाईक म्हणाले की, ''एसटी महामंडळाच्या सक्षमीकरणासाठी शासन कटिबद्ध आहे. कर्मचाऱ्यांचे हित आणि प्रवाशांचा विश्वास टिकवण्यासाठी एसटीची सेवा आणखी चांगली करण्यासाठी अनेक योजना राबविण्यात येत आहेत. काही तत्वनिष्ठ प्रश्न व आर्थिक अडचणी असल्या तरी त्यावर उपाययोजना सुरु आहेत. परंतु, एसटीचे खासगीकरण होईल, अशी अफवा पसरवून कर्मचारी वर्गात संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न काहीजण करत आहेत. असे प्रकार खपवून घेतले जाणार नाहीत. कर्मचारी बंधूंनी या अफवांवर विश्वास ठेवू नये.''






या कार्यक्रमास विविध कर्मचारी संघटनांचे पदाधिकारी, एसटीच्या स्थानिक अधिकाऱ्यांसह मोठ्या संख्येने कर्मचारी व प्रवासी उपस्थित होते. जलशीतकाच्या उभारणीमुळे प्रवाशांना आता स्वच्छ आणि थंड पाण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राष्ट्रीय एसटी कामगार काँग्रेस व स्थानिक अधिकाऱ्यांचे योगदान मोलाचे ठरले.

## आंतरराष्ट्रीय सहकार वर्षात राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनची महत्त्वपूर्ण भूमिका : मुख्यमंत्री फडणवीस यांची प्रशंसा

**कोपरगाव । किसन पवार**

आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने स्थापन केलेल्या शिखर समितीची महत्त्वपूर्ण बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत पार पडली. या बैठकीत राज्यातील सहकारी चळवळीच्या विस्तारासाठी राबवण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचा आढावा घेण्यात आला. महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या वतीने अध्यक्ष काका कोयटे यांनी फेडरेशनच्या उपक्रमांची सविस्तर माहिती सादर केली. आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाची सुरुवात शिर्डी येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय सहकार परिषदेद्वारे करण्यात आली असून, यानंतर संपूर्ण राज्यात ''सहकार दिंडी'', अहमदपूरपासून नागपूरपर्यंत ''सहकार ध्वज संचलन यात्रा'', तसेच बुलढाणा येथे राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा यासारख्या उपक्रमांची आखणी करण्यात आली आहे. त्याचबरोबर ''गाव तेथे सहकार चौक'' या अभिनव संकल्पनेद्वारे प्रत्येक गावात सहकार केंद्र उभारण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला. यासह सहकारी पतसंस्थांसाठी सिबिलसारखी क्रास प्रणाली, तसेच 'सहकार बास्केट' या नव्या डिजिटल संकल्पनेच्या अंमलबजावणीबाबतही चर्चा झाली. या सर्व उपक्रमांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भरभरून कौतुक केले. ''ही सहकार चळवळीच्या नव्या पर्वाची सुरुवात आहे,'' असे मत व्यक्त करत त्यांनी सहकार खात्याला राज्य फेडरेशनला आवश्यक ते सर्व सहकार्य देण्याचे स्पष्ट आदेश दिले. यावेळी फेडरेशनच्या वतीने सहकारी पतसंस्थांच्या कायद्यात आवश्यक सुधारणा सुचवण्यात आल्या. कायद्यात फेरबदल करताना राज्य फ ेडरेशनच्या पदाधिकाऱ्यांचा समावेश करण्याची मागणी अध्यक्ष कोयटे यांनी केली. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या माध्यमातून पतसंस्थांच्या अधिकाऱ्यांसाठी लवकरच डिप्लोमा अभ्यासक्रम सुरु करण्यात येणार असून या शैक्षणिक उपक्रमासाठी सहकार खात्याने सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. या बैठकीला सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, कृषी मंत्री माणिकराव कोकाटे, सहकार आयुक्त दीपक तावरे, राज्याचे मुख्य सचिव, फेडरेशनच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेखा लवांडे यांच्यासह विविध वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्र्यांच्या स्पष्ट पाठबळामुळे राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या उपक्रमांना अधिक चालना मिळणार असून आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष हे सहकार चळवळीसाठी नवे पर्व ठरणार, असा विश्वास बैठकीच्या निमित्ताने व्यक्त करण्यात आला.




## 'गुरुकुल' गाळेधारकांना धर्मादाय आयुक्तांची नोटीस

### भाडेकरार न करता थकबाकी प्रकरणी २५ जुलैला अंतिम सुनावणी

**अहमदनगर । प्रतिनिधी**


येथील लालटाकी परिसरातील अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक विकास मंडळाच्या गुरुकुल इमारतीतील १९ गाळेधारकांना भाडे थकविल्याप्रकरणी विकास मंडळाने दाखल केलेल्या दाव्यानुसार धर्मदाय आयुक्त, पुणे यांनी नोटीस बजावली असून २५ तारखेला याबाबत अंतिम सुनावणी होणार असून यावेळी हजर राहण्याचे आदेश कार्यालयाने काढले आहेत. याबाबतची संपूर्ण माहिती अशी की, जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षकांच्या मालकीच्या अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक विकास मंडळ या संस्थेची लालटाकी परिसरात गुरुकुल नावाची इमारत असून या इमारतीमध्ये एकूण २७ भाडेकरू आहेत त्यापैकी १९ भाडेकरूंनी गेल्या अनेक वर्षाचे गाळ्यांचे भाडे थकविले आहे तसेच आपल्या भाडेकराराचे दर तीन वर्षांनी करावयाचे नूतनीकरण देखील केलेले नाही. त्यामुळे विकास मंडळाच्या या भाडेकरूंकडे मोठ्या प्रमाणात भाडे थकबाकी आहे. या संदर्भात विद्यमान विश्वस्त मंडळाने या भाडेकरूशी वेळोवेळी संपर्क साधून नियमानुसार भाडेकराराचे नूतनीकरण करण्यासंदर्भात आवाहन केले होते. मात्र त्याला १९ जणांनी कोणताही प्रतिसाद न दिल्याने शेवटी विकास मंडळाचे अध्यक्ष प्रल्हाद भालेकर यांनी धर्मादाय आयुक्त, पुणे विभाग यांच्याकडे दावा दाखल केला आहे. त्यानुसार या सर्वांना नोटीसा पाठविण्यात आल्या असून त्याची सुनावणी २५ तारखेला होणार आहे. चाळीस वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या विकास मंडळाची गुरुकुल नावाची इमारत जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षकांच्या वर्गणीतून उभी राहिली आहे. त्या ठिकाणी जे गाळेधारक भाडेकरू टाकलेले आहेत त्यांनी वेळोवेळी भाडे कराराचे नुतनीकरण करणे आवश्यक होते तसेच नियमानुसार भाडेवाढ करणे देखील अपेक्षित होते, मात्र शिक्षकांच्या राजकारणात मागील विश्वस्त मंडळांनी या बाबींकडे दुर्लक्ष केले. यातील बहुतेक भाडेकरूंनी पोट भाडेकरू टाकले असून ते परस्पर भाडे वसूल करतात. मात्र विकास मंडळाचे नुकसान करतात. या संदर्भात विद्यमान विश्वस्त मंडळाने प्रथमतः त्यांच्याशी संपर्क करून त्यांना विनंती केली, नंतर वकिलामार्फत नोटीस दिली. त्यालाही फारशी दाद न दिल्याने अखेर विश्वस्त मंडळाने धर्मादाय आयुक्तांकडे दावा दाखल केला आहे. विकास मंडळाची वार्षिक सभा लवकरच होणार असून या सभेत या इमारतीतील सर्व गाळे रिकामे करून घेऊन नवीन करार करून लिलाव पद्धतीने भाडे करार करून भाडेकरू टाकण्यात यावेत, अशी मागणी जिल्ह्यातील विकास मंडळाच्या सभासदांनी केली आहे. नगर शहरातील अत्यंत मोक्याच्या ठिकाणी असलेल्या या इमारतीचे गाळेधारकांचे भाडे अत्यंत अल्प असून तेसुद्धा वेळेत आदा होत नसल्याने विकास मंडळ तोट्यात चालले आहे. परिणामी शिक्षकांच्या विकासाच्या संदर्भात कोणतेही काम करणे शक्य झालेले नाही. या इमारतीत असलेल्या गाळ्यांचे भाडे चालू बाजारभावाप्रमाणे करार केल्यास लाखो रुपये उत्पन्न मिळण्याची शक्यता आहे. मात्र जुन्या भाडेकरूंना शिक्षकांच्या राजकारणातील काही पुढाऱ्यांचे अभय असल्याने ते भाडेकरार करण्यास टाळत असल्याची माहिती सचिव संतोष आंबेकर यांनी दिली मागील विश्वस्त मंडळांनी या भाडे वसुलीबाबत कोणतीही कारवाई केली नसल्याने ही थकबाकी वाढत गेल्याची चर्चा देखील आहे. याबाबत आता धर्मादाय आयुक्तांच्या निर्णयाकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. गेल्या अनेक वर्षांपासूनचा रखडलेला भाडेकरारचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी चालना दिल्याबद्दल जिल्ह्यातील सभासदांकडून अध्यक्ष प्रल्हाद भालेकर, सचिव संतोष आंबेकर, उपाध्यक्ष दिलीप गंभीरे, खजिनदार सुवर्णा राठोड, माजी अध्यक्ष विलास गवळी, प्रदीप दळवी, माजी उपाध्यक्ष नवनाथ दिवटे, संजय शेंडगे, माजी सचिव संतोष मगर, विश्वस्त राजेंद्र निमसे, मुकुंदराज सातपुते, गणेश गायकवाड, चांगदेव काकडे, बाळासाहेब गमे, दत्तात्रय फुंदे, मनीषा गाढवे (शिंदे), अनिता उगले-नेहे, उर्मिला राऊत, स्वीकृत विश्वस्त सलीमखान पठाण, व्यवस्थापक सुरेंद्र आढाव यांचे अभिनंदन केले आहे.




### सरहद देशभर उपक्रम राबविणार

## स्व.भूपेन हजारिका जन्मशताब्दीनिमित्त

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**



यंदाच्या वर्षी भूपेन हजारिका यांच्या जन्मशताब्दीचे (८ सप्टेंबर १९२६-२०२६) वर्षसुरू होणार असुन देशाच्या सीमावर्ती भागातील जनतेशी नाते जोडण्यासाठी स्थापन झालेल्या सरहद संस्थेच्या वतीने भारतरत्न स्व.भूपेन हजारिका यांच्या जन्मशताब्दीनिमित्त वर्षभर पुणे, मुंबई तसेच दिल्लीत विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती सरहद संस्थेचे विश्वस्त शैलेश वाडेकर आणि अनुज नहार यांनी दिली. भूपेन हजारिका त्यांच्या अंतिम काळात मुंबईत सरहद संस्थेचा त्यांच्याशी संपर्क आला होता. ईशान्य भारतातील युवकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पुढाकार घेण्याचेही ठरले होते. महाराष्ट्राशी त्यांचे आपुलकीचे नाते होते. त्यांच्या आयुष्याचा दीर्घकाळ मुंबईतच गेला ते महाराष्ट्राला आपली कर्मभूमी मानत असत. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या नावाने संस्थेने त्यांच्या कुटुंबियांच्या संमतीने भूपेन हजारिका राष्ट्रीय पुरस्कार सुरू केला. यंदाच्या वर्षीही ईशान्य भारतातील विविध मान्यवरांना त्यांच्या नावे पुरस्कार देण्यात येणार आहे. शिवाय पुस्तक प्रकाशने, परिसंवाद, व्याख्याने. हजारिका यांच्या अप्रकाशित गीतांना संगीत देणे, त्यांच्या नावाने स्टुडिओ आणि स्व.जमनाबाई फिरोदिया ईशान्य भारत भवनाची पुण्यात उभारणी असे विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. संगीताच्या माध्यमातून हिंसाचार आणि दहशतवादाचे प्रमाण कमी करणे शक्य आहे असे त्यांचे ठाम मत होते. हीच स्व.भूपेन हजारिका यांच्या जन्मशताब्दी निमित्त राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची मध्यवर्ती कल्पना आहे. ईशान्य भारत विकास मंत्री ज्योतिरादित्य शिंदे तसेच महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनाही यासाठी निमंत्रित करण्यात येणार असुन या उपक्रमांचा शुभारंभ सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पुण्यात करण्यात येईल कळविण्यात आले.



## रक्तदानाचे महत्त्व कृतीत उतरवणारे डॉ. वाजा आजच्या पिढीचे जिवंत आदर्श

**मुंबई । गुरुदत्त वाकदेकर**

''रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान'' या भावनेने प्रेरित होऊन, दादर रेल्वे स्थानकावर १२ जुलै २०२५ रोजी आयोजित रक्तदान शिबिरात लोकप्रिय डॉक्टर प्रागजी वाजा यांनी आपल्या जीवनातील १०८व्यांदा रक्तदान करून एक प्रेरणादायी इतिहास घडवला. या शिबिरात बोलताना डॉ. वाजा म्हणाले, ''रक्तदान हे केवळ परोपकार नव्हे, तर ते आरोग्यासही लाभदायक आहे. प्रत्येक नागरिकाने किमान सहा महिन्यांतून एकदा तरी रक्तदान अवश्य करावे. आपण दिलेले रक्त अवघ्या २४ तासांत शरीरात पुन्हा निर्माण होते. त्यामुळे शरीर तंदुरुस्त राहते आणि अनेकांचे प्राण वाचवले जाऊ शकतात.'' या उपक्रमात २०० पेक्षा अधिक रक्तदात्यांचे रक्त संकलित करण्यात आले. दरवर्षी सातत्याने पार पडणाऱ्या या शिबिरात यंदाही विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती लावली. मा. नगरसेवक अनिल कोकीळ, सचिन पडवळ, नायर रुग्णालयाचे डॉ. गिरीश राजध्यक्ष, बबन गावकर, सुधीर साळवी, राम साळगावकर, साहित्यिक पत्रकार डॉ. अनुज केसरकर, साहित्यिका पूर्णिमा शिंदे यांच्यासह अनेक मान्यवरांचा सक्रिय सहभाग लाभला. डॉ. वाजांचे रुग्णसेवेतील समर्पण आणि समाजकार्य हे पथदर्शी आहे. १०८ वेळा रक्तदान करून त्यांनी समाजापुढे एक विलक्षण आदर्श ठेवला आहे. त्यांच्या या स्तुत्य कार्याबद्दल उपस्थितांनी त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन केले आणि त्यांच्या निरंतर प्रेरणादायी कार्यासाठी सदिच्छा व्यक्त केली. डॉ. वाजा यांना परिसरात ''देवदूत'' म्हणून ओळखले जाते. त्यांच्या कार्याने प्रेरित होऊन, त्यांच्या असंख्य चाहत्यांनी या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आणि त्यांच्याविषयी कृतज्ञता व शुभेच्छा व्यक्त केल्या. हा रक्तदान उपक्रम केवळ रक्तदान नाही, तर मानवतेच्या मूल्यांचा जागर करणारा एक उत्सव ठरतो. अशा कृतीतून व्यक्त होणाऱ्या समाजभानामुळेच डॉ. प्रागजी वाजा हे आजच्या पिढीचे खरे जिवंत आदर्श ठरतात.

## भूमिगत नाल्यात गुदमरून दोन सफाई कामगारांचा मृत्यू

**संगमनेर । नितीनचंद्र भालेराव**

नगरपालिकेच्या सांडपाणी प्रकल्पासाठी सुरू असलेल्या भूमिगत गटार कामादरम्यान एक भीषण दुर्घटना घडली आहे.विषारी वायूने गुदमरून एकाचा मृत्यू झाला असून त्याला वाचविण्यासाठी गेलेल्या तरुणाचा देखील उपचारादरम्यान मृत्यू झाल्याने संगमनेर तालुक्यात शोककाळा पसरली आहे.दरम्यान याच घटनेत मदतकार्यात काम करणारे माजी सैनिक यांची देखील प्रकृती गंभीर असल्याचे माहिती आहे. अतुल रतन पवार( वय १९) रियाज जावेद पिंजारी (वय २१) असे मृत झालेल्या तरुणांची नावे असून यामध्ये मदतीसाठी गेलेले माजी सैनिक प्रकाश कोटकर यांची प्रकृती गंभीर असून त्यांच्यावर उपचारासाठी सुरु आहेत. कोल्हेवाडी रोडवर गटार सफाईचे काम सुरू असताना गटारात उतरलेल्या अतुल रतन पवार (वय १९, रा. संजय गांधीनगर, संगमनेर) आणि रियाज जावेद पिंजारी (वय २१, रा. मदिनानगर, संगमनेर) यांचा गुदमरून मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच संगमनेर शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रविंद्र देशमुख, इतर पोलीस अधिकारी आणि अग्निशमन दलाचे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले.त्यांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने बचावकार्य सुरू केले. त्यानंतर पालिकेचे आरोग्य अधिकारी अमजद बशीर पठाण यांनी मध्यरात्री शहर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.






# शिक्षण केवळ पदवी मिळवण्यासाठी नाही तर समाज घडवण्यासाठी- हाजी खानसाहब

## ज्येष्ठ नागरिक संघाच्यावतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान

**अहमदनगर । आबीद खान**

''आजचा दिवस हा केवळ यशाचा नाही, तर परिश्रम, चिकाटी आणि जिद्दीला मिळालेल्या सन्मानाचा दिवस आहे. शिक्षण हे फक्त पदवी मिळवण्यासाठी नसून समाज घडवण्यासाठी असते,'' असे मत ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष हाजी खानसाहब शेख यांनी व्यक्त केले. मुकुंदनगर येथील ज्येष्ठ नागरिक संघाच्यावतीने दहावी, बारावी, सीए, वकील, डॉक्टर तसेच इतर व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा एन. एम. गार्डन येथे संपन्न झाला. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून आयटीआयचे प्राचार्य खालीद जहागीरदार, माजी प्राचार्य नवेद बिजापुरे, नोटरी पब्लिक ॲड. हाफीज जहागीरदार, नगरसेवक आसिफ सुलतान, मखदूम सोसायटीचे अध्यक्ष आबीद खान, माजी नगरसेविका नसीम खान, अलकरम हॉस्पिटलचे डॉ. जहीर मुजावर, डॉ. सईद शेख, आर्किटेक्ट अर्शद शेख, डॉ. परवेज अशरफी, जाहिद सय्यद, पत्रकार जहीर सय्यद, मुख्याध्यापक मुन्नवर हुसेन, पत्रकार अफजल आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात सामुदायिक संविधान वाचनाने झाली. विद्यार्थ्यांचा शाल, पुष्पगुच्छ आणि स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना विविध विषयांवर मार्गदर्शन केले. काही विद्यार्थ्यांनीही आपली मनोगते व्यक्त करून या उपक्रमाचे कौतुक केले.

हाजी खानसाहब शेख म्हणाले की, ''तुम्ही आज यशाचे गमक उचलले आहे, त्याचा उपयोग समाजोपयोगी कार्यासाठी झाला पाहिजे. प्रत्येक यशस्वी विद्यार्थी भविष्यात डॉक्टर, वकील, सीए, इंजिनीयर होईलच, पण त्याहीपेक्षा संवेदनशील आणि सजग नागरिक म्हणून घडणे आवश्यक आहे.'' कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संघाचे अध्यक्ष हाजी खानसाहब, उपाध्यक्ष हाजी रऊफ मोहम्मद शेख (बिल्डर), कार्याध्यक्ष अल्हाज आलम खान, सचिव बशीर पठाण, सहसचिव शेख फकीर मोहम्मद, खजिनदार इस्माईल पठाण यांच्यासह हाजी शेख बिलाल, कादिर, शेख अब्दुल रहीम, गोटू जहागीरदार, इब्राहिम पठाण, मिर्झा नवेद अंजुम, शेख हबीब (पेंटर), सय्यद इकबाल, ॲड. सय्यद मोहम्मद अन्वर, हाजी सय्यद अब्दुल अजीज, शेख गुलाम दस्तगीर, शेख इस्माईल, हाजी शेख अब्दुल सईद, सय्यद आरिफ, हाजी शेख शरफुद्दीन, पठाण हबीब, सय्यद नुर मोहम्मद, ॲड. ताज अशरफ आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इस्माईल शेख व हाजी शरफुद्दीन यांनी तर आभार प्रदर्शन रऊफ बिल्डर यांनी केले.

# अहिल्यानगरचे कचरा व्यवस्थापन कोलमडले, महिन्यापासून कचरा न उचलल्याने शहर दुर्गंधीमय

## संतप्त महिलांचा प्रशासकांस घेराव

**अहमदनगर । प्रतिनिधी**



अहिल्यानगर महापालिकेच्या कचरा संकलन व्यवस्थेचा पूर्णपणे बोजवारा उडाल्याने शहरातील अनेक भागांत दुर्गंधी व अस्वच्छतेने गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. महिनाभरापासून कचरा न उचलल्याने रस्त्यांवर कचऱ्याचे ढीग साचले असून, नागरिक आरोग्याच्या धोक्याखाली जीवन जगत आहेत. पाईपलाईन रोड व पद्मा नगर परिसरात परिस्थिती अत्यंत भीषण बनली आहे. कचऱ्यामुळे मोकाट कुत्र्यांचा त्रास, डासांची वाढ, वास आणि संसर्गजन्य आजारांचे प्रमाण वाढले आहे.

लहान मुलं, वृद्ध व आजारी व्यक्तींना या अस्वच्छतेचा अधिक त्रास होत असल्याचे स्थानिक नागरिकांनी सांगितले. महापालिका आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी नुकतीच या भागाची पाहणी केली. पाहणीदरम्यान महिला नागरिकांनी थेट त्यांच्यासमोर व्यथा मांडल्या. विशेषतः एका महिलेला ''आयुक्त साहेब, कचरा टाकू तरी कुठे?'' असा थेट सवाल करत संताप व्यक्त केला. महिलांनी प्रशासनाच्या ढिसाळतेबाबत रोष व्यक्त करत पालिकेला खडसावले. माजी नगरसेवक निखिल वारे यांनीही मागील आठवड्यात या प्रश्नावर आवाज उठवत, ''महापालिकेने तीन महिन्यांपासून कचरा संकलनाचे कोणतेही योग्य नियोजन केलेले नाही. त्यामुळे नागरिकांकडून या कालावधीतील कचरा कर वसूल करू नये,'' अशी मागणी केली होती. त्यांनी महापालिकेला दररोज घंटागाडीमार्फत घराघरांतून कचरा संकलन करण्याचे आवाहन केले आहे. ''शहरातील कचरा संकलन व्यवस्थेतील अडचणींची आम्ही गंभीर दखल घेतली आहे. सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या एजन्सीविरुद्ध तक्रारी प्राप्त झाल्यानंतर ती हटवून नवीन एजन्सीकडे काम सोपवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. नव्या एजन्सीसोबत कामकाजाचा आराखडा अंतिम टप्प्यात असून लवकरच शहरात नियमित, वेळेवर व यंत्रबद्ध पद्धतीने कचरा संकलन सुरू होईल. नागरिकांना स्वच्छतेच्या दृष्टीने दिलासा देणे हे आमचे मुख्य उद्दिष्ट आहे. यामध्ये कोणतीही ढिलाई खपवून घेतली जाणार नाही. नागरिकांनी पालिकेवर विश्वास ठेवावा, लवकरच समाधानकारक बदल दिसून येतील,'' असे आश्वासन आयुक्त डांगे यांनी दिले.

# डॉ. शरद कोलते स्कूलमध्ये शालेय साहित्य, गणवेश वाटप

**नगर तालुका । प्रतिनिधी**

गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे ही चांगले नागरिक घडवण्याची पहिली पायरी असल्याचे प्रतिपादन आयएमएसचे प्रा. विजय शिंदे यांनी पारगाव येथील डॉ. शरद कोलते इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये केले. त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व गणवेश वाटप करण्यात आले. यावेळी शाळेतील शिक्षक, विद्यार्थी व पालक उपस्थित होते. पारगावमधील ही शाळा केवळ अभ्यासापुरती मर्यादित न राहता, विद्यार्थ्यांबरोबरच परिसरातील शेतकरी, युवक, महिला यांना विविध सामाजिक व शैक्षणिक विषयांवर सतत मार्गदर्शन करते. शेतीतील नवे प्रयोग, करिअर निवड, महिलांचे सक्षमीकरण, तसेच विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व विकास यावर तज्ज्ञांच्या माध्यमातून सत्रे घेतली जातात.



याचबरोबर आषाढी एकादशीनिमित्त प्रभातफेरीद्वारे पर्यावरण संरक्षणाचा संदेश दिला गेला. इंग्रजी माध्यम असूनही भारतीय संस्कृती व मूल्यांचा आदर शाळेत राखला जातो. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्यांची रुजवणूक होते व समाजोपयोगी नागरिक घडण्यास मदत होते, असेही प्रा. शिंदे यांनी सांगितले. कार्यक्रमाचे नियोजन ईश्वर तनपुरे, कीर्ती मगर, निकिता तनपुरे व प्रीती कुमटकर यांनी केले.

# श्रद्धा आशा अशोक भोसले यांचे सी.ए. फायनलमध्ये सुयश

## अवघ्या २३ व्या वर्षी मिळवला मोठा विजय

**अहमदनगर । प्रतिनिधी**

मे २०२५ मध्ये पार पडलेल्या चार्टर्ड अकाउंटंट (सी.ए.) फायनल परीक्षेत भुतकरवाडी येथील श्रद्धा आशा अशोक भोसले हिने उल्लेखनीय यश मिळविले आहे.



अवघ्या २३ वर्षाच्या वयात श्रद्धाने ही कठीण परीक्षा उत्तीर्ण करत भुतकरवाडी आणि अहमदनगर (अहिल्यानगर) जिल्ह्याची मान उंचावली आहे. ही परीक्षा भारतातील सर्वात कठीण परीक्षांपैकी एक मानली जाते. श्रद्धाने आपल्या जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर हे यश संपादन केले.

तिच्या यशात तिची आई आशा भोसले व आजी यांचे मोठे योगदान राहिले. श्रद्धा या सामाजिक कार्यकर्ते दिगंबर भोसले यांची पुतणी आहेत. श्रद्धा हिच्या या यशाबद्दल गावकऱ्यांपासून ते शिक्षक, नातेवाईक आणि मित्रपर्यंत सर्वत्र तिचे अभिनंदन होत आहे. तिच्या या यशामुळे परिसरातील विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळेल, असा विश्वास व्यक्त होत आहे.

# औषधनिर्मिती म्हणजे विज्ञान, नैतिकता आणि समाजसेवेचा त्रिवेणी संगम- डॉ. रमेश सावंत

## डॉ. पाउलबुधे फार्मसीत गुरुपौर्णिमेनिमित्त व्याख्यान

**अहमदनगर । विजय मते**

सेवा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित डॉ. एन. जे. पाऊलबुद्धे कॉलेज ऑफ फार्मसी, वसंत टेकडी येथे गुरुपौर्णिमेनिमित्त विद्यार्थ्यांसाठी विशेष व्याख्यान व गुरु पूजन सोहळा उत्साहात पार पडला. फार्मास्युटिकल केमिस्ट्री विभाग आणि आतील गुणवत्ता हमी कक्ष (IQAC) यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशन, विळद घाट येथील कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राध्यापक व उपप्राचार्य डॉ. रमेश लक्ष्मण सावंत प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी ''औषध रसायनशास्त्र व औषध संकल्पनेची मूलतत्त्वे'' या विषयावर विद्यार्थ्यांना सुलभ,




अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. डॉ. सावंत आपल्या व्याख्यानात म्हणाले, ''औषधनिर्मिती ही केवळ प्रयोगशाळेतील प्रक्रिया नसून विज्ञान, नैतिकता आणि समाजसेवेचा संगम आहे. एक जबाबदार फार्मासिस्ट हा केवळ औषध बनवणारा शास्त्रज्ञ नसून, समाजाच्या आरोग्याचा रक्षक असतो.'' ते पुढे म्हणाले, ''औषध संकल्पनेत प्रारंभिक कल्पना, उपयुक्त घटकांचे विश्लेषण, रचनात्मक बदल, परिणामकारकता तपासणे आणि अंतिम उत्पादन या टप्प्यांतून प्रक्रिया घडते.

कृत्रिम बुद्धिमत्ता, संगणकीय विश्लेषण आणि माहिती तंत्रज्ञानाच्या साहाय्याने ही प्रक्रिया आज अधिक वेगवान व अचूक बनली आहे. विद्यार्थ्यांनी या नवतंत्रज्ञानाचा सकारात्मक वापर करावा,'' असे आवाहन त्यांनी यावेळी केले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने झाली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्याम पंगा यांनी गुरुपौर्णिमेचे महत्त्व विषद करत पाहुण्यांचे स्वागत केले. संस्थेचे सहसचिव रामकिसन देशमुख यांनी विशेष उपस्थिती नोंदवत कार्यक्रमाची शोभा वाढवली. या वेळी डी. फार्मसीच्या प्राचार्या अनुराधा चव्हाण, एम. फार्मसीचे समन्वयक डॉ. वेणू कोला, डॉ. रोशनी सूर्यवंशी, डॉ. प्रसाद घुगरकर, स्वाती कडनोर आदी मान्यवर उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी आपली मनोगते सादर करत गुरूजनांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाचे संयोजन फार्मसी विभागप्रमुख व शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. सूत्रसंचालन श्रद्धा मुंदडा यांनी केले तर आभारप्रदर्शन आश्लेषा राजुळे हिने केले. संस्थेचे अध्यक्ष विनय पाऊलबुद्धे, उपाध्यक्ष रामभाऊ बुचकूल, खजिनदार दादासाहेब भोईटे, व्यवस्थापकीय संचालक साई पाऊलबुद्धे आणि सदस्य रघुनाथ कारमपुरी यांनी सर्व उपस्थितांना गुरुपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या.

# बारस्कर यांचा 'मागेल त्याला झाड' उपक्रम कौतुकास्पद- आहेर



**अहमदनगर । प्रतिनिधी**

''वृक्षारोपण व संवर्धन ही काळाची गरज असून संपत बारस्कर यांनी सुरू केलेला 'मागेल त्याला झाड' हा उपक्रम नागरिकांच्या सहकार्यातून एक लोकचळवळ ठरत आहे. या माध्यमातून प्रभाग क्रमांक १ लवकरच हरित प्रभाग म्हणून ओळखला जाईल,'' असे प्रतिपादन शाहीर अरुण आहेर यांनी केले. देवीकृपा वसाहत येथे मनपाचे माजी विरोधी पक्ष नेते संपत बारस्कर यांच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला. यावेळी अरुण आहेर, संदीप गोसावी, सुभाष सोनवणे, शरद गुंड, शिवाजी साळवे, विठ्ठल लोखंडे, मंगेश साळवे, प्रभाकर घोरपडे, सुरेखा अडम, रोहिणी आहेर, सुकन्या गोसावी आदी मान्यवर व नागरिक उपस्थित होते. या वेळी बोलताना शाहीर अरुण आहेर म्हणाले, ''दिवसेंदिवस वाढणारे प्रदूषण, पर्यावरणातील असमतोल आणि तापमानातील बदल या सगळ्या गोष्टींमुळे वृक्षारोपण अनिवार्य झाले आहे. मेट्रो शहरांप्रमाणेच लहान शहरांनाही याचा फटका बसतो आहे. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने किमान एक तरी झाड लावावे, ही काळाची गरज आहे.'' कार्यक्रमाचे आयोजन करणारे माजी विरोधी पक्ष नेते संपत बारस्कर म्हणाले, ''वृक्ष आपल्याला मोफत आणि स्वच्छ ऑक्सिजन देतात. याचे महत्त्व आपल्याला कोरोना काळात प्रकर्षाने जाणवले. म्हणूनच आम्ही 'मागेल त्याला झाड' या संकल्पनेतून प्रत्येक नागरिकाच्या सहभागातून वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धनाची चळवळ उभारली आहे.'' ''प्रभागातील नागरिक आपल्या घरासमोर दोन झाडं लावतात, यामध्ये आंब्याचे वृक्ष विशेषतः मोठ्या प्रमाणात लावले जात आहेत. विशेष म्हणजे ज्येष्ठ नागरिक या उपक्रमात पुढाकार घेत असून त्यांनी स्वतः वृक्षारोपणाची जबाबदारी उचलली आहे. यामुळे हा प्रभाग भविष्यात नक्कीच एक हरित परिसर म्हणून ओळखला जाईल,'' असेही बारस्कर यांनी सांगितले.

रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

**भाड्याने देणे**
परिचय हॉटेलजवळ, बालिकाश्रम रोडवर कॉर्पोरेट ऑफिस, बँक, शोरूम, क्लिनिक आदींसाठी ८०० स्क्वेअर फुटाचे दोन मजले बांधलेली जागा भाड्याने देणे आहे.
- संपर्क -
८८८८३४७४११

निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.



मे. रुपाली एजन्सी
फुड प्रॉडक्ट मटेरियल सप्लायर्स
राधिका लॉजजवळ, तापकीर लेन, आडत बाजार, अहमदनगर - ४१४००१.
(०२४१) २३४३०६०, ९८२२८४३०६०
ई-मेल - rupaliagency@gmail.com

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com **(वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)**



# शिष्यवृत्ती परीक्षेत घोगरगाव विद्यालयाचे यश

## राष्ट्रीय ग्रामीण यादीत आरोही गारुडकरचा सहावा क्रमांक

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी विद्यालय, घोगरगाव या विद्यालयाने इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश संपादन करत यशाची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे. इयत्ता पाचवीतील विद्यार्थिनी आरोही सचिन गारुडकर हिने तब्बल २७६ गुण मिळवून राष्ट्रीय ग्रामीण यादीत सहाव्या क्रमांकावर झेप घेत विद्यालयाचा गौरव वाढवला. पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत ५४ विद्यार्थ्यांपैकी ३३ विद्यार्थी पात्र ठरले असून आठ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झाले आहेत. यामध्ये आरोही सचिन गारुडकर (२७६), संस्कृती योगेश शेळके (२५८), आदित्य बाबासाहेब जगताप (२५०), समर्थ सुनील जगताप (२४८), समृद्धी दत्तात्रय बोरुडे (२४२), नामेश दत्तात्रय वाघ (२३६), समीक्षा भरत गांगर्डे (२३६) आणि आराधना विनायक धामणे (२३६) या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांना विभागप्रमुख व वर्गशिक्षक सचिन गारुडकर आणि सतीश गोरे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत ३० विद्यार्थ्यांपैकी २५ विद्यार्थी पात्र ठरले असून १० विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले आहेत. यात रमाकांत हरिभाऊ महाडिक (२३२), मयूर अशोक वाळके (२२६), दिग्विजय युवराज शेळके (२१४), आदित्य सचिन शिंदे (२१०), अजय संभाजी वाळके (२०८), करण दत्तात्रय बागल (२०८), समृद्धी सुनील वाघुले (२०८), अर्जुन श्रीराम बोरुडे (२०२), जय अशोक कुलांगे (२०२) आणि अभ्यंक प्रदीप भोस (१९८) या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. या विद्यार्थ्यांना सतीश गोरे, दत्तात्रय हजारे, संदीप गावडे आणि अंबादास कोथिंबीरे यांचे मार्गदर्शन लाभले. शिष्यवृत्तीपात्र विद्यार्थ्यांचे रयत शिक्षण संस्थेचे माजी मॅनेजिंग कौन्सिल सदस्य बाबासाहेब भोस, विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे, सहाय्यक विभागीय अधिकारी प्रमोद तोरणे, बाबासाहेब नाईकवाडी, जनरल बॉडी सदस्य बाजीराव कोरडे, स्थानिक स्कूल कमिटीचे ज्येष्ठ सदस्य नामदारभाई शेख, राजेंद्र उगले, उत्तर विभागीय सल्लागार मंडळाचे सदस्य तानाजी बोरुडे, घोगरगावच्या सरपंच सुजाता भोसले, उपसरपंच दिलीप भोस, माजी सरपंच बाळासाहेब उगले, विद्यालयाचे प्राचार्य वसंत नरवडे, पर्यवेक्षक प्रवीणकुमार लोंढे, माजी पर्यवेक्षक सुरेश काळे, गुरुकुल प्रमुख दत्तात्रय हजारे आणि पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.



# विद्यार्थ्यांनी कुटुंबासह गावाचे नाव उज्वल करावे- सभापती नवले

**बेलापूर । शफीक बागवान**

ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांनी पुढील शिक्षणाचा अचूक मार्ग निवडुन परिश्रम घेऊन विविध क्षेत्रात नवलौकिक संपादन करुन कुटुंबाचे व गावाचे नाव उज्वल करावे,असे आवाहन श्रीरामपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुधीर नवले पा.यांनी केले आहे. बेलापूर विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्था बेलापूर यांच्या वतीने परिसरातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन राजेंद्र सातभाई हे होते.या वेळी बोलताना राजेंद्र सातभाई यांनी विद्यार्थ्यामध्ये गुणवत्ता असेल तर तो कुठल्याही परिस्थितीवर मात करू शकतो असा विश्वास व्यक्त केला.

यावेळी बेलापुर येथील जे. टी. एस. हायस्कूल, महाविद्यालय, बेलापूर खुर्द येथील केशव गोविंद विद्यालय, वाघोजी रामजी पाटील विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी पंचायत समितीचे माजी उपसभापती दत्ता कुऱ्हे ,चंद्रकांत नाईक, ,शेषराव पवार आदिंनी मनोगत व्यक्त केले.या वेळी संस्थेचे व्हा.चेअरमन सविताताई मेहेत्रे, संचालक पंडीतराव बोंबले, शिवाजी पा. वाबळे, नंदकिशोर नवले,विलास मेहेत्रे, अशोक कुऱ्हे, सुधाकर खंडागळे, काशिनाथ गाढे, भास्करराव वाबळे,अंतोन अमोलीक, भरत नवले , दत्तात्रय कुऱ्हे, सदाशिव मेहेत्रे , अनिल नाईक, वसंतराव शिंदे, तुकाराम मेहेत्रे, प्रकाश कु-हे प्रा.ज्ञानेश गवले, भिकाजी मेहेत्रे, महेश नवले, पांडुरंग कु-हे, विजय खंडागळे, महेश मेहेत्रे, महेश नवले आदी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन सचिव विजय खंडागळे यांनी केले तर जालिंदर गाढे यांनी आभार मानले.

# वृक्ष लागवडीसह संगोपनावर भर देणे गरजेचे- हभप म्हस्के



**शेवगाव । लक्ष्मण मडके**

हिंगणगाव ने येथे ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या संयुक्त सहभागातून प्रेरणादायी वृक्षारोपण कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात संत श्री ज्ञानेश्वर संस्थान, नेवासा येथील महंत हभप वेदांताचार्य देविदास म्हस्के यांच्या शुभहस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या वेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना महाराज म्हणाले, ‘‘हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र‘‘ हे स्वप्न साकारण्यासाठी वृक्ष लागवड ही फक्त सरकारी योजना न राहता ती एक लोकचळवळ बनली पाहिजे. मात्र केवळ झाड लावून समाधान मानता कामा नये, तर त्या झाडांच्या संगोपनासाठी योग्य पाणी व्यवस्थापन, संरक्षणासाठी जाळ्यांची उभारणी आणि नियमित देखभाल करणे आवश्यक आहे. ही जबाबदारी केवळ ग्रामपंचायत किंवा सरपंचांची न राहता प्रत्येक ग्रामस्थाने ती स्वीकारली पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले. या कार्यक्रमाला हभप ज्ञानेश्वर डांगरे, सुभाष पवार, लोकनियुक्त सरपंच सतीश पवार, शिवसंग्राम तालुका अध्यक्ष संदीप बामदळे, उपसरपंच संदीप शिंदे यांच्यासह साहेबराव पवार, संजय पवार, बाबासाहेब गरड, अण्णासाहेब बामदळे, किरण साठे, नामदेव बामदळे, लक्ष्मण ढवळे, लक्ष्मण पवार, कृष्णा ढवळे, देविदास गरड, कल्याण पवार, दादा म्हस्के, आजिनाथ पांगरे, दत्तात्रय म्हस्के, अंबादास आगळे, गणेश शिंदे, पाराजी दळे, संजय जाधव, बाबासाहेब ढवळे, महादेव ढवळे तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार ग्रामविकास अधिकारी सुरेश खरड यांनी मानले.

# शिवकालीन १२ गड-किल्ल्यांचा युनेस्को जागतिक वारसा यादीत समावेश



**कोपरगाव । किसन पवार**

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य उभं करताना आधारस्तंभ ठरलेल्या १२ ऐतिहासिक गड-किल्ल्यांचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत झालेला समावेश हा महाराष्ट्रासाठी, देशासाठी आणि प्रत्येक शिवभक्तासाठी अभिमानाचा क्षण आहे. या ऐतिहासिक घोषणेनंतर कोपरगाव भाजपाच्यावतीने मोठ्या उत्साहात जल्लोष साजरा करण्यात आला.

या निर्णयामुळे या किल्ल्यांचे जागतिक स्तरावर संवर्धन, संरक्षण व अभ्यासासाठी नव्या दिशा खुल्या झाल्या आहेत. यामुळे भविष्यातील पिढ्यांना शिवकालीन वैभवाचा प्रत्यक्ष अनुभव घेता येणार असून, ही बाब अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. या ऐतिहासिक क्षणाचे औचित्य साधून माजी आमदार स्नेहलता कोल्हे व युवानेते विवेक कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पार्टी कोपरगाव मतदारसंघात विविध कार्यक्रम घेण्यात आले. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकांना पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर ढोल-ताशांच्या गजरात आणि फटाक्यांच्या आतषबाजीने परिसर दुमदुमून गेला. लाडू वाटप करून शिवप्रेमींनी आनंद व्यक्त

### भाजपचा जल्लोष

केला.

या कार्यक्रमास भाजपाचे शहर मंडळ अध्यक्ष वैभव आढाव, पूर्वमंडळ अध्यक्ष विशाल गोर्डे, पश्चिम मंडल अध्यक्ष सुनील कदम, तालुका युवा मोर्चा अध्यक्ष अमोल गवळी, बाळासाहेब नरोडे, माजी अध्यक्ष कैलास रहाणे, राजेंद्र सोनवणे, गोपीनाथ गायकवाड, प्रदीप नवले, भीमा संवत्सरकर, संदीप गुरुळे, प्रकाश दवंगे, सतीश रानवडे, आकाश वाजे, विवेक सोनवणे, वैभव गिरमे, विजय चव्हाणके, सोमनाथ मस्के, रवी शेलार, अजय सुपेकर, राकेश काले, अमोल पेकळे, देव बागुल, कैलास राहणे, दीपक चौधरी, शशिकांत दरपेल, मुकुंद उदावंत, मनोज इंगळे, संदीप गायकवाड, कैलास नागरे, निखिल वर्मा, साई नरोडे, सुजल चंदनशिव, रोहित आढाव, शुभम सोनवणे, अर्जुन मोरे, रोहिदास पाखरे, संजय खरोटे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# विजेच्या बाबतीत श्रीरामपूर समृद्ध- आ.ओगले

### २२०/३३ के. व्हि. वीज उपकेंद्राचे भूमिपूजन

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

सुमारे ५९ कोटी ६२ लक्ष रुपयांच्या २२०/३३ के. व्हि उपकेंद्राचे भूमिपूजन जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे आणि आमदार हेमंत ओगले यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. यावेळी आमदार हेमंत ओगले म्हणाले की, सद्यस्थितीत श्रीरामपूर तालुक्याला बाभळेश्वर आणि नेवासा तालुक्यातून वीज पुरवठा होतो त्यामुळे शेतकरी व नागरिकांना उच्च दाबाने वीजपुरवठा होण्यास अडचणी निर्माण होतात अनेक ठिकाणचे ट्रांसफार्मर वारंवार ओव्हरलोड होत असल्याने शेतकरी अडचणीत सापडलेला होता या वीज उपकेंद्रामुळे ती अडचण देखील दूर होणार आहे. त्याचबरोबर एमआयडीसी येथे नव्याने उद्योगधंदे येण्यास मदत होईल जेणेकरून तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. २२०/३३ के. व्हि उपकेंद्राच्या निर्मितीमुळे श्रीरामपूर विजेच्या बाबतीत समृद्ध होणार असून येणाऱ्या काळात श्रीरामपूर महावितरण कार्यालयाचे विभाजन करून बेलापूर उपकेंद्र मंजूर करावे तसेच महावितरणकडे रिक्त असलेल्या जागा तातडीने आमदार झाल्याच्या पहिल्या दिवसांपासून मी विधानसभेमध्ये श्रीरामपूर विज केंद्राचा प्रश्न लावून धरला. सध्या चालू असलेल्या पावसाळी अधिवेशनामध्ये देखील भूमिपूजन अभावी वीज केंद्राचे काम प्रलंबित असल्याचे शासनाच्या निदर्शनास आणून दिले त्यावर लगेचच कार्यवाही होऊन आज सदर विज केंद्राचा शुभारंभ संपन्न होत आहे. निश्चितच त्याचा फायदा मतदारसंघाला होणार असल्याचे ते म्हटले. राज्याचे मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्रजी फडणवीस, ऊर्जा राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांचे देखील आमदार ओगले यांनी आभार मानले आहे.

यावेळी युवा नेते करण ससाणे, जिल्हा काँग्रेसचे कार्याध्यक्ष सचिन गुजर, माजी सभापती बाबासाहेब दिघे, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर मुरकुटे, सभापती सुधीर नवले, तालुकाध्यक्ष प्रमोद भोसले, शहराध्यक्ष अण्णासाहेब डावखर, माजी उपनगराध्यक्ष राजेंद्र सोनवणे, रितेश रोटे, संचालक राजेंद्र पाऊलबुद्धे, कांतीशेठ पटेल, मुन्ना पठाण, सरपंच प्रेमचंद कुंकूलोळ, सुनील शिरसाठ, संदीप मगर, प्रवीण नवले, के. सी शेळके, अरुण मंडलिक, सुनील साबळे, अशोक जगधने , दिपक वमने, सरबतजितसिंग चुग, संजय गोसावी, नवाज जहागीरदार, मिथुन शेळके, गणेश काते, बाबा वायदंडे, सुरेश ढूबे, रितेश चव्हाणके, के.के. खंडागळे, निलेश लबडे, सनी मंडलिक, सुनिल जगताप, विशाल साळवे, कल्पेश पाटणी यांच्यासह आदी उपस्थित होते.




# ‘पॅनग्राम’ ठरतोय इंग्रजी हस्ताक्षर सुधारणेस नवसंजीवनी

### शिक्षिका गायकवाड यांचा नाविन्यपूर्ण उपक्रम


**श्रीरामपूर । संदीप पाळंदे**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, बेलापूर बुद्रुक (मुली) येथे इंग्रजी हस्ताक्षर सुधारण्यासाठी राबवला जाणारा ‘पॅनग्राम’ उपक्रम विद्यार्थिनींसाठी नवसंजीवनी ठरत आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थिनींच्या हस्ताक्षरात सौंदर्य, स्पष्टता आणि आत्मविश्वासात लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून येत आहे. शाळेतील प्राथमिक शिक्षिका शीतल गायकवाड यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली राबवला जाणारा ‘पॅनग्राम’ उपक्रम सध्या चर्चेचा विषय ठरला आहे. The big dwarf only jumps किंवा Quick foxes climb steep hills यांसारख्या सर्व २६ इंग्रजी अक्षरांचा समावेश असलेल्या वाक्यांचा सराव करून विद्यार्थिनींना इंग्रजी हस्ताक्षर सुधारण्यास मदत केली जात आहे. गायकवाड म्हणाल्या, ‘‘पॅनग्राम उपक्रमामुळे मुली एकाच वेळी इंग्रजी अक्षरांची रचना, शब्दांचे संयोग आणि वाक्यरचना आत्मसात करत आहेत. अक्षरांचा योग्य आकार, रेषांचे सातत्य आणि एकसमानता यावर भर देत या उपक्रमाने त्यांच्या हस्ताक्षरात लक्षणीय सुधारणा घडवली आहे. सुरुवातीला मुलींना हस्ताक्षर लेखनात अडचणी येत होत्या. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वासही कमी होत होता. हा उपक्रम राबवल्यानंतर त्यांच्यात सकारात्मक बदल दिसून येत आहे.‘‘ ‘पॅनग्राम’ उपक्रमामुळे विद्यार्थिनींना इंग्रजी भाषेची गोडी लागली असून हा खेळकर व रंजक उपक्रम त्यांच्या शैक्षणिक प्रगतीस चालना देणारा ठरत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थिनींना इंग्रजीसारख्या विषयात आत्मविश्वास देण्याचे श्रेय शीतल गायकवाड यांच्यासारख्या नाविन्यपूर्ण शिक्षकांना जाते, अशी भावना पालकांनी व्यक्त केली आहे.

# महाराष्ट्राचा विवेकी आवाज प्रा. डॉ. एन. डी. पाटील

फुले, शाहू, आंबेडकरी विचारांचा पुरोगामी वारसा चालवणारे सत्यशोधक विचारवंत प्रा डॉ एन डी पाटील यांचा आज जयंती. प्रा डॉ एन डी पाटील यांचे पूर्ण नाव नारायण ज्ञानदेव पाटील असे असून त्यांचा जन्म १५ जुलै १९२९ रोजी सांगली जिल्ह्यातील नागाव मधील ढवळी येथे एका गरीब शेतकरी कुटुंबात झाला. घरची परिस्थिती गरिबीची असूनही त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी पुणे विद्यापीठातून अर्थशास्त्रातून एम ए आणि एल एल बी चे शिक्षण घेतले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी १९५४ ते १९५७ या कालावधीत सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये अध्यापनाचे कार्य केले. याशिवाय त्यांनी कमवा आणि शिका योजनेचे रेक्टर म्हणूनही काम पाहिले. १९६० साली ते इस्लामपूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजचे प्राचार्य म्हणून रुजू झाले. त्यांच्यावर कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा मोठा प्रभाव होता. कर्मवीरांच्या विचारातून प्रेरणा घेऊनच त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले. शिवाजी विद्यापीठाचे पहिले सल्लागार म्हणूनही त्यांनी काम पाहिले. ( १९६२ ) त्यानंतर शिवाजी विद्यापीठाचे सिनेट सदस्य म्हणूनही त्यांनी काम पाहिले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी १९७६ ते १९७८ या कालावधीत शिवाजी विद्यापीठात समाजशास्त्र विभागाचे डीन म्हणूनही काम पाहिले. याचबरोबर १९९१ साली त्यांनी महाराष्ट्र राज्य शिक्षण आयोगाचे सदस्य म्हणून काम पाहिले. प्रा डॉ एन डी पाटील हे १९५९ पासून रयत शिक्षण संस्थेचे कौन्सिल मॅनेजमेंट सदस्य म्हणून कार्यरत होते. १९९० साली रयत शिक्षण संस्थेच्या चेअरमनपदी त्यांची नियुक्ती झाली. प्रा डॉ एन डी पाटील यांनी शैक्षणिक क्षेत्रात आपल्या कार्य कर्तुत्वाचा आगळा वेगळा ठसा उमटवला.

शैक्षणिक क्षेत्राप्रमाणेच राजकीय क्षेत्रातही त्यांनी आपल्या कार्य कर्तुत्वाने वेगळा ठसा उमटवला. १९४८ साली त्यांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. त्यानंतर १९५७ साली त्यांनी मुंबईतील गिरणी कामगारांच्या संघटनेचे सरचिटणीस म्हणून काम पाहिले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी महाराष्ट्राच्या विधान परिषदेत १८ वर्ष सदस्य म्हणून काम केले. १९७८ ते १९८० या काळात ते महाराष्ट्राचे सहकार मंत्री होते. १९८५ साली ते कोल्हापूर मतदार संघातून विधानसभेचे सदस्य म्हणूनही निवडून गेले. १९९९ ते २००२ या काळात ते लोकशाही आघाडी सरकारचे निमंत्रक होते. आपले आयुष्य समाज कार्यासाठी घालवणाऱ्या प्रा डॉ एन डी पाटील यांना पुरस्काराने गौरविण्यात आले. अनेक विद्यापीठाने त्यांना मानाची डि. लिट पदवी देऊन गौरवले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी अनेक विषयांवर सखोल लेखन केले. शेती जमिनीवरील कमाल मर्यादा आणि महाराष्ट्र सरकारचा प्रतिगामी कायदा, समाज विकास योजनेचे वस्त्रहरण, वाढती महागाई आणि ग्राहकांची ससेहोलपट, काँग्रेस सरकार आणि शेतकऱ्यांची लूट, शेतीमालाला किफायतशीर किंमतीची हमी आणि घाऊक व्यापाराचे राष्ट्रीयकरण, महाराष्ट्र सरकारच्या श्वेतपत्रिकेचे कृष्णस्वरूप, शेवटी हे शिक्षण आहे तरी कोणासाठी ?, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे ही त्यांनी लिहिलेले पुस्तके गाजली. प्रा डॉ एन डी पाटील यांनी अंधश्रद्धा निर्मूलन क्षेत्रातही काम केले. त्यांची मते ठाम होती. महाराष्ट्राच्या गेल्या सत्तर वर्षांच्या सामाजिक आणि राजकीय इतिहासात प्रा. डॉ एन डी पाटील हे एक धडाडिचे आणि लढाऊ नेते म्हणून ओळखले जातात. प्रा डॉ एन डी पाटील म्हणजे महाराष्ट्राचा विवेक आवाज. १७ जानेवारी २०२२ रोजी वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राचा पुरोगामी आवाज हरपला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या पुरोगामी चळवळीची मोठी हानी झाली. आज त्यांच्या जयंतीदिनी त्यांना विनम्र अभिवादन!





श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

समाजसंवाद



# प्रभागरचनेत राजकीय हस्तक्षेप नको- लंके

## महाविकास आघाडीचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**अहमदनगर । प्रतिनिधी**

आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नगर शहरातील प्रभाग रचनेबाबत महाविकास आघाडीच्या वतीने जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांना निवेदन सादर करण्यात आले. ''प्रभाग रचना ही पारदर्शक व निः पक्षपाती असावी, त्यात कोणताही राजकीय हस्तक्षेप होऊ नये,'' अशी ठाम भूमिका खासदार निलेश लंके यांनी मांडली. १० जून २०२५ रोजी महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने निर्गमित केलेल्या आदेशानुसार ''ड'' वर्ग महानगरपालिकांसाठी चार सदस्यीय प्रभाग पद्धत लागू करण्यात आली आहे. ही प्रक्रिया महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ५ अन्वये व राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेने लागू करण्यात आली आहे.

त्यानुसार प्रभाग रचनेत २०११ ची जनगणना, भौगोलिक सलगता आणि लोकसंख्येतील समतोल यांचा विचार अनिवार्य आहे. याच पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन २०१८ मध्ये झालेली प्रभाग रचना पारदर्शक आणि तांत्रिकदृष्ट्या योग्य होती, त्यामुळे तीच रचना कायम ठेवावी, अशी मागणी केली. २०१८ मध्ये सरासरी लोकसंख्येतील फक्त १० टक्के फरक राखण्यात आला होता आणि कोणत्याही प्रगणक गटाची फोड करण्यात आली नव्हती.

खासदार लंके यांनी स्पष्टपणे सांगितले की, ''प्रभाग रचना ही पक्षपातीपणाऐवजी कायदेशीर आणि निःपक्षपाती पद्धतीने व्हावी, हीच जनतेची अपेक्षा आहे. शासनाच्या आदेशातही ही भूमिका अधोरेखित करण्यात आली असून त्याचे पालन न केल्यास निवडणूक प्रक्रियेत अडथळा निर्माण होऊ शकतो.'' या वेळी माजी महापौर अभिषेक कळमकर, शिवसेना उपजिल्हाप्रमुख गिरीश जाधव, युवा सेनेचे राज्य सहसचिव विक्रम राठोड, नगरसेवक योगीराज गाडे, माजी महापौर दीप चव्हाण, नलिनी गायकवाड आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# महात्मा फुले जनआरोग्य योजना टीमच्या वतीने वृक्षारोपण उपक्रम



**नगर तालुका । प्रतिनिधी**

निसर्ग मानवाला अनेक प्रकारे देणं देत असतो. त्याच कृतज्ञतेच्या भावनेतून, महात्मा ज्योतीराव फुले जनआरोग्य योजना आणि प्रधानमंत्री आयुष्मान भारत जनआरोग्य योजनेअंतर्गत काम करणाऱ्या कर्मचारी, अधिकारी आणि आरोग्यमित्रांनी वृक्षारोपणाचा स्तुत्य उपक्रम राबविला. या उपक्रमाचे नेतृत्व योजनेचे विभागीय दक्षता प्रमुख विठ्ठल वांढेकर यांनी केले. नगर तालुक्यातील ऐतिहासिक चांदबीबी महाल परिसरात विविध प्रकारची झाडे लावण्यात आली. पावसाळी वातावरणामुळे झाडांची चांगली वाढ होईल असा विश्वास वांढेकर यांनी व्यक्त केला. झाडांचे संगोपन आणि वेळोवेळी पाहणी करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. यावेळी डॉ. प्रियंका मडके (जिल्हाप्रमुख), डॉ. अनिकेत भालसिंग (जिल्हा वैद्यकीय अधिकारी), टीमलीडर हर्षवर्धन साळवे, आरोग्यमित्र सुनील राहिंज, तुषार वाघमारे, योगेश नागपुरे, अन्सारअली सय्यद, गणेश कडणर, अर्जुन चव्हाण, तुषार पोळ, मयूर रोकडे, नेहा वराडे, शिल्पा तेलंगूर, संकेत भिंगारदिवे, विक्रम कोकणे, शाम आकडे, कश्यप साळवे, ललित बाफना आदी उपस्थित होते. पर्यावरण संवर्धनाबरोबरच समाजसेवेचा आदर्श ठेवणाऱ्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# शिष्यवृत्ती परीक्षेत दापोडी शाळेचे यश

**दौंड । श्याम ठाणेदार**



महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी घेण्यात आलेल्या इयत्ता पाचवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत दापोडी येथील जिल्हा परिषद शाळेने उल्लेखनीय यश संपादन केले. या परीक्षेची राज्य व जिल्हा गुणवत्ता यादी नुकतीच जाहीर झाली असून, शाळेचे दोन विद्यार्थी जिल्हा गुणवत्ता यादीत झळकले आहेत. श्रेयश संतोष खोडवे (गुण २५८) याची नवोदय विद्यालयात निवड झाली असून, समर्थ साईनाथ रुपनवर (गुण २५६) याने देखील गुणवत्ता यादीत स्थान मिळवले आहे. याशिवाय आरोही खंडू खोडवे (गुण २३०), शौर्य किशोर चव्हाण (गुण २२८) आणि सोहम गणपत सरके (गुण १७६) या विद्यार्थ्यांनीही उल्लेखनीय कामगिरी केली आहे. या यशाबाबत मार्गदर्शन करणाऱ्या वर्गशिक्षिका पुष्पा चव्हाण यांनी, ''योग्य नियोजन, सातत्यपूर्ण अभ्यास आणि भरपूर सराव या त्रिसूत्रीचा अवलंब करून हे यश शक्य झाले,'' असे सांगितले. शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र फणसे, केंद्रप्रमुख लता हिंगणे तसेच सर्व सहकारी शिक्षकांनीही विद्यार्थ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन केले. नवोदय विद्यालयासाठी झालेली निवड, मंथन परीक्षेत मिळवलेला राज्यात प्रथम क्रमांक आणि शिष्यवृत्ती परीक्षेतील हे उत्तुंग यश यामुळे शाळेचे सर्व स्तरांमधून अभिनंदन होत आहे. दौंड तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी संजय महाजन, शाळा व्यवस्थापन समिती आणि दापोडी गावचे सर्व ग्रामस्थ यांनी विद्यार्थ्यांचे तसेच शिक्षकांचे यशस्वी मार्गदर्शनासाठी मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.

# मराठा सेवा संघ संभाजी ब्रिगेडच्या प्रविणदादांवर हल्ल्याच्या निषेधार्थ आंदोलन

**अहमदनगर । प्रतिनिधी**

संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीणदादा गायकवाड यांच्यावर ता.१३ जुलै रोजी अक्कलकोट येथे एका हिस्ट्रीशिटर गुन्हेगाराने हल्ला करत त्यांच्या चेहऱ्यावर काळे फासल्याची धक्कादायक घटना घडली. या भ्याड कृत्याचा मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड तसेच अन्य समविचारी संघटनांनी तीव्र शब्दांत निषेध केला आहे. या गुंडगिरीला रोखण्यासाठी आणि दोषींवर कठोर कारवाई व्हावी यासाठी मंगळवार ता.१५ जुलै रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे आंदोलन करून निवेदन देण्यात येणार आहे. यावेळी आरोपी गुन्हेगारावर आणि त्याच्या समर्थकांवर संघटित गुन्हेगारीच्या कलमांनुसार गुन्हे दाखल करून कडक कारवाई करण्याची मागणी करण्यात येणार आहे. या आंदोलनात मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेडसह सर्व समविचारी संघटनांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष इंजि. सुरेश इथापे यांनी केले आहे.




# प्रवीणदादा गायकवाड यांच्यावर हल्ला

## आरोपींवर कठोर कारवाई करावी- भारतीय जनसंसद

**अहमदनगर । प्रतिनिधी**

संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीणदादा गायकवाड यांच्यावर अक्कलकोट येथे झालेल्या शाईफेक प्रकाराचा भारतीय जनसंसदच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला असून, हल्लेखोरांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची आणि गायकवाड यांना संरक्षण देण्याची मागणी मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. संभाजी ब्रिगेडच्या नेतृत्वाखाली समाजप्रबोधन व युवकांना रोजगाराभिमुख घडवण्यासाठी प्रवीणदादा गायकवाड सातत्याने कार्यरत आहेत. शिवाजी महाराज, संभाजी महाराज, महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व अण्णाभाऊ साठे यांचे विचार समाजात रुजवण्यासाठी त्यांनी मोठे योगदान दिले आहे. मात्र, शिवधर्म फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांनी एका कार्यक्रमाच्या वेळी गायकवाड यांची गाडी अडवून त्यांच्यावर शाईफेक केली आणि धक्काबुक्की केली. यामुळे राज्यातील कायदा-सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणी शिवधर्मचे अध्यक्ष दीपक काटे (जि. पुणे) यांच्यासह सात जणांविरुद्ध अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तरीही आरोपींवर अद्याप कठोर कारवाई झाली नसल्याने संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. या पार्श्वभूमीवर भारतीय जनसंसदचे अध्यक्ष अशोक सब्बन, सुधीर भद्रे, रवी सातपुते, राजेंद्र कर्डीले, नलिनी गायकवाड, बाळासाहेब पालवे, विक्रम क्षिरसागर, इरफान तांबोळी, शिवाजी भोसले, रईस शेख, बबलु खोसला आदी पदाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्र्यांना निवेदन दिले. या हल्ल्याला जबाबदार असलेल्या व्यक्तींना त्वरीत अटक करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे.

# यशवंत चांदजी महिला गोविंदा पथकाचा दशकपूर्ती सराव शुभारंभ उत्साहात संपन्न



सौजन्य अस्मिता सु. सकपाळ

**भांडुप । गुरुदत्त वाकदेकर**

यशवंत चांदजी स्पोर्ट्स क्लबच्या महिला गोविंदा पथकाने आपल्या गौरवशाली दशकपूर्ती वर्षात प्रवेश करत गुरुपौर्णिमेच्या पवित्र दिवशी, एक खास सराव शुभारंभ कार्यक्रम भांडुप येथील यशवंत चांदजी सावंत विद्यामंदिर आणि कनिष्ठ महाविद्यालयाच्या पटांगणात मोठ्या उत्साहात साजरा केला. परिसर रांगोळ्यांनी, पारंपरिक देखाव्यांनी आणि सजावटीने नटलेला होता. सनईच्या मंगलध्वनीत, कार्यक्रमाची सुरुवात झाली. दीपज्योतीने सर्व गोपिकांचे औक्षण करून त्यांचे मैदानात आत्मीय स्वागत करण्यात आले. या विशेष सोहळ्याला नयना श्याम तावडे अध्यक्षस्थानी उपस्थित होत्या. श्याम तावडे, मा. नगरसेविका जागृतीताई पाटील, निकिता घाडीगावकर, राहुल जाधव यांच्यासह अनेक मान्यवरांनी आपली उपस्थिती नोंदवली. कार्यक्रमात छत्रपती महाराणी ताराबाई भोसले प्रतिष्ठानच्या लहान मुलींनी सादर केलेले लाठी-काठीचे प्रात्यक्षिक हे विशेष आकर्षण ठरले. या मुलींचे मोफत प्रशिक्षण हेच मैदान देत आहे, याची माहिती यावेळी देण्यात आली. यानंतर मोठ्या गोपिकांनी लहान गोपिकांना खांद्यावर घेऊन घातलेली प्रदक्षिणा आणि नंतर आत्मविश्वासाने दिलेली ४ थरांची सलामी आणि ५ थरांची सुसंघटित रचना, हे दृश्य प्रेक्षकांसाठी रोमहर्षक ठरले. टाळ्यांचा कडकडाट आणि ''रणरागिणीं''साठी उस्फूर्त जल्लोष वातावरणात भर टाकत होता.कार्यक्रमात सर्व मान्यवर व गोपिकांचा विशेष सत्कार करण्यात आला. जागृतीताई पाटील यांनी आपल्या मनोगतातून ''ही कौशल्ये प्रत्येक स्त्रीने आत्मसात केली पाहिजेत ही काळाची गरज आहे'' असे स्पष्टपणे सांगितले आणि दशकपूर्तीच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. प्रा. आरती कोकाटे-केसरकर यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन आत्मीयतेने व ओघवत्या शैलीत करत संपूर्ण कार्यक्रमात रंग भरले. कार्यक्रमाची सांगता आनंद, गर्व आणि प्रेरणा अशा वातावरणात झाली. यशवंत चांदजी महिला गोविंदा पथकाच्या या दशकपूर्ती सराव शुभारंभाने केवळ कसरती नव्हे, तर नारीशक्तीचा भव्य जागर घडवून आणला!